॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

# Shri Navnath Bhaktisar

## ADHYAYA 16 — SHODASHODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

***Shri Ganeshaaya Namah | Shri  Saraswatyei Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |***


### Summary

*Chapter 16 finds **Kanifnath** as a guest in the luxurious courts of the **Women's Kingdom**, where **Machindranath** sends beautiful temptresses and worldly distractions in a failed attempt to make him stay. After a month of strong resistance, Machindranath gives up, showering his guest with rich gifts before sending him onward through **Gauda-Bangaal**, as his fame **spreads rapidly** ahead of him. Deep within a forest along the way, Kanifnath meets **Gorakshanath**, who is traveling separately on his own holy journey.*

*What begins as a standard talk about their teachers quickly turns into a fierce, friendly contest of magical powers over a mango orchard. The rivalry gets heated as each mocks the other's master, until Gorakshanath shares a shocking truth: Kanifnath's own guru, **Jalindarnath**, has been left to rot for ten painful years in a dung-pit by **King Gopichand** of **Helapattan**. Shocked by this news, the two yogis make peace and part ways. A furious Kanifnath marches straight toward Helapattan, determined to punish the king.*

*Unaware that his old crime has been discovered, King Gopichand rides out in great royalty to welcome the famous sage and beg to become his disciple. Instead, Kanifnath confronts him with the horrible fate of his master, and the terrified king falls to his feet, crying and begging for mercy. Word of the clash reaches **Queen Mainavati**—who had originally brought Jalindarnath to the kingdom. Rushing to Kanifnath's camp, she confesses her family's terrible mistake, begging the sage to make Jalindarnath appear again and restore her son's lost honor. Kanifnath completely comforts her, removing all fear from both mother and son, and setting the stage for Jalindarnath's grand rescue in the chapters to come.*


## Ovee 1

जयजयाजी दिगंबरा । आद्यनामें विश्वंभरा । वर्णितां तुझिया गुणसंभारा । मति अपूर्व होतसे ॥

### Transliteration

**Jaya-jaya-ji Digambaraa | Aadyanaame Vishvambharaa | Varnitaa tujhiyaa guna-sambhaaraa | Mati apoorva hotase ||**

## Ovee 2

वर्णितां तुझिया गुणसंपत्ती । वेदभांडारे अपूर्व होती । सहस्त्रफणी वाहतां माथीं । शीण वाचे दावीतसे ॥

### Transliteration

**Varnitaa tujhiyaa guna-sampattee | Veda-bhaandaare apoorva hotee | Sahastra-phanee vaahataa maathee | Sheena vaache daaveetase ||**

## Ovee 3

पंचानन ऐसे धेडे । परी दो अक्षरीं झाले धडे । सरस्वतीचें शिणोनि तोंड । करी सांड विलापाची ॥

### Transliteration

**Panchaanana aise dhende | Paree dho aksharee jhaale dhade | Sarasvateeche shinoni tondu | Karee saanda vilaapaachee ||**

## Ovee 4

आठभार उद्भिज्ज देही । कमळपत्रांते पुरे मही । सप्ताब्धींची अपूर्व शायी । तव गुणसाररसज्ञ ॥

### Transliteration

**Aathabhaara udbhijja dehee | Kamala-patraante pure mahee | Sapta-abdheenchee apoorva shaayee | Tavaguna-saara-rasa-jnyu ||**

## Ovee 5

ऐसा सर्वगुणज्ञ पुरुष । येवोनि बैसला अबद्धमतीस । भक्तिसार ग्रंथ सुधारस । स्वयें निर्मिला आपणचि ॥

### Transliteration

**Aisaa sarva-guna-jnya purushu | Yevoni baisalaa abaddha-mateesu | Bhakti-saara grantha sudhaarasu | Svaye nirmilaa aapanachi ||**

## Ovee 6

तरी मागिले अध्यायीं सकळ कथन । कानिफा आणि वायुनंदन । युद्धसमयीं ऐक्य होऊन । सुखसागरा मिळालें ॥

### Transliteration

**Taree maagile adhyaayee sakala kathanu | Kaaniphaa aani Vaayu-nandanu | Yuddha-samayee aikya hounu | Sukha-saagaraa milaale ||**

## Ovee 7

यावरी कानिफा स्त्रीदेशांत । गेले श्रीगडमुंडगांवांत । तेथे भेटोनि मच्छिंद्रातें । आतिथ्यातें भोगिले ॥

### Transliteration

**Yavaree Kaaniphaa Stree-deshaantu | Gele Shree-gada-mundagaavaantu | Tethe bhetoni Machchindraate | Aatithyaate bhogile ||**

## Ovee 8

भोगिले परी कैंसे रीतीं । तेंचि ऐका येथूनि श्रोतीं । मच्छिंद्राचे काम चित्तीं । एक अर्थी उदेला ॥

### Transliteration

**Bhogile paree kainse reetee | Tenchi aikaa yethuni shrotee | Machchindraache kaama chittee | Eka arthee udelaa ||**

## Ovee 9

कीं कानिफा जाईल स्वदेशांत । श्रीगोरक्षा करील श्रुत । मग तो धांवोनि येईल येथ । नेईल मातें येथुनी ॥

### Transliteration

**Kee Kaaniphaa jaaeela sva-desha-antu | Shree Gorakshaa kareela shrutu | Maga toh dhaavoni yaeela yethu | Naeela maate yethunee ||**

## Ovee 10

तरी गोरक्ष मम शिष्य आहे । ऐसें यासी श्रुत करुं नये । अनेक योजूनि उपाय । येथें राहता करावा ॥

### Transliteration

**Taree Goraksha mama shishya aahe | Aise yaasee shruta karu naye | Aneka yojuni upaayu | Yethe raahataa karaavaa ||**

## Ovee 11

ऐसी युक्ती रचूनि चित्तीं । करावें म्हणे आतिथ्य बहू रीतीं । म्हणोनि बोलावूनि बहुत युक्तीं । सकळां मच्छिंद्र सांगतसे ॥

### Transliteration

**Aisee yuktee rachuni chittee | Karaave mhane aatithya bahoo reetee | Mhanoni bolaavuni bahuta yuktee | Sakalaa Machchindra saangatase ||**

## Ovee 12

याउपरी आणिक योजना करीत । कीं विषयीं गोवावा कानिफनाथ । मग हा कदा देशांत । जाणार नाहीं सर्वस्वें ॥

### Transliteration

**Yauparee aanika yojanaa kareetu | Kee vishayee govaavaa Kaanipha Naathu | Maga haa kadaa deshaantu | Jaanaara naahee sarvasve ||**

## Ovee 13

चंद्राननी मृगांकवदनी । पाठवीतसे शिबिरालागुनी । परी तो नातळे कामवासनीं । इंद्रियदमनी महाराज ॥

### Transliteration

**Chandra-ananee mrigaanka-vadanee | Paathaveetase shibiraa-laagunee | Paree toh naatale kaama-vaasanee | Indriya-damanee Mahaaraaju ||**

## Ovee 14

म्हणाल तरी त्या कैशा युवती । प्रत्यक्ष कामाच्या मूर्ती । जयांचे नेत्रकटाक्षें होती । वेडेपिसे देवादि ॥

### Transliteration

**Mhanaala taree tyaa kaishaa yuvatee | Pratyaksha Kaamaa-chyaa moortee | Jayaanche netra-kataakshe hotee | Vedempise devaadi ||**

## Ovee 15

जयेचें पाहतां मुखमंडण । तपी सांडिती तपाकारणें । येवोनि मुंगी लुंगी होवोन । मागें भ्रमती जपी तपी ॥

### Transliteration

**Jayeche paahataa mukha-mandanu | Tapee saanditee tapaa-kaaranu | Yevoni mungee lungee hovonu | Maage bhramatee japee tapee ||**

## Ovee 16

जयेचे अधर पोंवळ्यांपरी दिसती । दर्शन दाळिंबबीज गोमटी । गौरवर्ण पिकाघाटी । ग्रीवा दर्शवी बाहेर ॥

### Transliteration

**Jayeche adhara povalyaamparee disatee | Darshana daalimba-beeja gomatee | Gaura-varna pikaaghaatee | Greevaa darshavee baaheru ||**

## Ovee 17

कीं अनंत चंद्राचा प्रकाश जैसा । कीं उडुगणपतीचा द्वितीय ठसा । जयांच्या नखाकृतिलेखा । चंद्रकोरी मिरवल्या ॥

### Transliteration

**Kee ananta chandraachaa prakaasha jaisaa | Kee udu-gana-pateechaa dviteeya thasaa | Jayaanchyaa nakha-akriti-lekhaa | Chandra-koree miravalyaa ||**

## Ovee 18

असो ऐसे स्त्रियांचे वर्ण । कीं भानुचि पावला उदयभान । ऐसिया स्त्रिया पाठवोनि स्थान । चेतविती कामासी ॥

### Transliteration

**Aso aise striyaanche varnu | Kee bhaanuchi paavalaa udaya-bhaanu | Aisiyaa striyaa paathavoni sthaanu | Chetavitee kaama-asee ||**

## Ovee 19

परी तो नातळे महाराज । हा वृत्तांत मच्छिंद्रा कळला सहज । मग म्हणे शिष्य कटकाचा समाज । कामवासनीं गोवावा ॥

### Transliteration

Paree toh naatale Mahaaraaju | Haa vrittaanta Machchindraa kalalaa sahaju | Maga mhane shishya kataka-achaa samaaju | Kaama-vaasanee govaavaa ||

## Ovee 20

ऐसाही यत्न करुनि पाहतां । कामिनींचा श्रम झाला वृथा । शिष्यकटकही येईना हाता । उपाय कांहीं चालेना ॥

### Transliteration

Aisaahee yatna karuni paahataa | Kamineenchaa shrama jhaalaa vrithaa | Shishya-katakahee yaeenaa haataa | Upaaya kaanhee chaalenaa ||

## Ovee 21

असो ऐसे छळणांत । एक मास राहिले तेथ । परी कोपें देव होतां उदित । सहजस्थितीं लोटले ॥

### Transliteration

Aso aise chalanaantu | Eka maasa raahile tethu | Paree kope deva hotaa uditu | Sahaja-sthitee lotale ||

## Ovee 22

असो लोटल्या एक मास । मग पाचारुनि मच्छिंद्रास । म्हणती आज्ञा द्यावी आम्हांस । स्वदेशासी जावया ॥

### Transliteration

Aso lotalyaa eka maasu | Maga paachaaruni Machchindraasu | Mhanatee aajnyaa dyaavee aamhaansu | Sva-deshaasee jaavayaa ||

## Ovee 23

मग अवश्य म्हणोनि मच्छिंद्रनाथ । नानासंपत्ती द्रव्य ओपीत । गज वाजी उष्ट्र अमित । द्रव्य बहुत दिधले ॥

### Transliteration

Maga avashya mhanoni Machchindra Naathu | Naanaa-sampattee dravya opeetu | Gaja vaajee ushtraamitu | Dravya bahuta didhale ||

## Ovee 24

शिबिरें कनाथा पडप थोर । तंबू राहुट्या पृथगाकार । शिबिका मुक्ताझालरा छत्र । वस्त्राभरणी भरियेले ॥

### Transliteration

Shibire kanaathaa padapa thoru | Tamboo raahutyaa prithagaakaaru | Shibikaa muktaa-jhaalaraa chatru | Vastraa-bharanee bhariyele ||

## Ovee 25

ऐसी ओपूनी अपार संपत्ती । बोळवीतसे मच्छिंद्रजती । एक कोस बोळवोनि नमिती । परस्परांसी आदरें ॥

### Transliteration

Aisee opuunee apaara sampattee | Bolaveetase Machchindra-jatee | Eka kosa bolavoni namitee | Parasparaansee aadare ||

## Ovee 26

ऐसें बोळवोनि कटकभार । स्वस्थाना आला नाथ मच्छिंद्र । येरीकडे तीर्थवर । करीत आला स्वदेशा ॥

### Transliteration

Aise bolavoni kataka-bhaaru | Sva-sthaanaa aalaa Naatha Machchindru | Yeree-kade teertha-varu | Kareeta aalaa sva-deshaa ||

## Ovee 27

सहज आले मुक्कामेंमुक्काम । लंघुनि स्त्रीदेश सुगम । पुढें गौडबंगाल स्थान उत्तम । नानाक्षेत्रें हिंडती ॥

### Transliteration

Sahaja aale mukkaam-em-mukkaamu | Langhuni Stree-desha sugamu | Pudhe Gauda-Bangaala sthaana uttamu | Naanaa-kshetre hindatee ||

## Ovee 28

परी जया गांवीं जाय नाथ । त्या गांवीं लोक करिती आतिथ्य । सर्व पाहूनि भक्तिवंत । उपचारें मिरवती ॥

### Transliteration

Paree jayaa gaavee jaaya naathu | Tyaa gaavee loka karitee aatithyu | Sarva pahuni bhakti-vantu | Upachaare miravatee ||

## Ovee 29

इच्छेसम सकळ अर्थ । पूर्ण होऊनि शिष्यसांप्रदायीं होत । म्हणोनि वर्णिती कीर्त । मुखोमुखीं उल्हासें ॥

### Transliteration

Ichche-sama sakala arthu | Poorna houni shishya-saampradaayee hotu | Mhanoni varnitee keertu | Mukho-mukhee ulhaase ||

## Ovee 30

मग या गावींचे त्या गांवीं लोक । येऊनि नेती सकळ कटक । दावूनि भक्तिभाव अलोलिक । बोळविती पुढारा ॥

### Transliteration

Maga yaa gaaveenche tyaa gaavee loku | Yeuni netee sakala kataku | Daavuni bhakti-bhaava aloliku | Bolavitee pudhaaraa ||

## Ovee 31

ऐसें श्रवंण करीत करीत । कीर्तिमागे केर्ती होत । ती सत्कीर्ती हेळापट्टणांत । प्रविष्ट झाली जगमुखें ॥

### Transliteration

Aise shravanna kareeta kareetu | Keertimaage keertee hotu | Tee sat-keertee Helaa-pattanaantu | Pravishta jhaalee jaga-mukhe ||

## Ovee 32

बहुत जनांचे वाचे स्तुती । अहाहा स्वामी ऐसें म्हणती । मग राजांगणी ही कीर्ती । हेलावली सेवकमुखें ॥

### Transliteration

Bahuta janaanche vaache stutee | Ahaahaa svaamee aise mhanatee | Maga raajaanganee hee keertee | Helaavalee sevaka-mukhe ||

## Ovee 33

कीर्ति ऐकूनि नृपनाथ । पुढें प्रेरिता झाला दूत । त्याकरवी उत्तम वृत्तांत । मुनिकटकाचा आणविला ॥

### Transliteration

Keerti aikuni nripa-naathu | Pudhe preritaa jhaalaa dootu | Tyaakaravee uttama vrittaantu | Muni-kataka-achaa aanavilaa ||

## Ovee 34

ते सांगती मुनीचा राजयोग । गांवोगांवीहूनि शिबिरें सुरंग चांग । धांवताती घेऊनि मागोमाग । स्वामीलागीं राहावया ॥

### Transliteration

Tey saangatee muneechaa raaja-yogu | Gavogaaveehuni shibire suranga chaangu | Dhaavataatee gheuni maago-maagu | Svaamee-laagee raahaavayaa ||

## Ovee 35

पुढें नाथध्वज येऊन । शिबिरें चालती त्यामागून । शिष्यकटकासी मागूनि गमन । कानिफाचे होतसे ॥

### Transliteration

Pudhe naatha-dhvaja yeunu | Shibire chaalatee tyaamaagunu | Shishya-katakaasee maguni gamanu | Kaaniphaache hotase ||

## Ovee 36

ऐसें मार्गीं करितां गमन । तो येरीकडे जगन्नाथाहून । गोरक्ष बंगालदेशांत येऊन । गांवोगांव भ्रमतसे ॥

### Transliteration

Aise maargee karitaa gamanu | Toh yeree-kade Jagannaatha-hunu | Goraksha Bangaala-desha-anta yeunu | Gaavo-gaava bhramatase ||

## Ovee 37

तो सहजमार्गी करितां गमन । महीप्रवाही तरुव्यक्त विपिन । तया विपिनीं गजकर्णनंदन । सहजस्थितीं भेटला ॥

### Transliteration

**Toh sahaja-maargee karitaa gamanu | Mahee-pravaahee taru-vyakta vipinu | Tayaa vipinee Gaja-karna-nandanu | Sahaja-sthitee bhetalaa ||**

## Ovee 38

तेणें पाहिलें गोरक्षासी । गोरक्षें पाहिलें कानिफासी । दृष्टादृष्टी होतां आदेशीं । एकमेकां बोलिले ॥

### Transliteration

**Tene paahile Gorakshaasee | Gorakshe paahile Kaaniphaasee | Drishtaa-drishtee hotaa aadeshee | Ekamekaa bolile ||**

## Ovee 39

करुनि स्थिर शिबिकासन । खालीं उतरला कर्णनंदन । मग भरजरी गालिचा महीं पसरुन । गोरक्षासी बैसविले ॥

### Transliteration

**Karuni sthira shibika-asanu | Khaalee utaralaa karna-nandanu | Maga bhara-jaree gaalichaa mahee pasarunu | Gorakshaasee baisavile ||**

## Ovee 40

आपण बैसे उपसवें नेटी । बोले कानिफा वाग्वटी । नाथपंथ हा वरदपुटी । कोण गुरु लाहिला ॥

### Transliteration

**Aapana baise upasave netee | Bole Kaaniphaa vaagvatee | Naatha-pantha haa varada-putee | Kona guru laahilaa ||**

## Ovee 41

हें ऐकून गोरक्षनाथ । मच्छिंद्रजन्मापासूनि कथा सांगत । वरदपाणी उदयमित्र । प्रसन्न झाला तयासी ॥

### Transliteration

**Hey aikuna Goraksha-Naathu | Machchindra-janmaapaasuni kathaa saangatu | Varada-paanee udaya-mitru | Prasanna jhaalaa tayaasee ||**

## Ovee 42

तरी त्याचा दासानुदास । मी म्हणवितों महापुरुष । परी श्रीगुरु कानिफादेहास । गुरु कोण मिरवला तें सांगा ॥

### Transliteration

**Taree thyaachaa daasa-anu-daasu | Mee mhanavito mahaa-purushu | Paree Shree-guru Kaanipha-dehaasu | Guru kona miravalaa tey saangaa ||**

## Ovee 43

ऐसे गोरक्ष बोल ऐकून । कानिफा सांगे जालिंदरकथन । जन्मापासूनि वर्तमान । दत्तकृपा आगळी ॥

### Transliteration

Aise Goraksha bola aikunu | Kaaniphaa saange Jaalindara-kathanu | Janma-apaasuni vartamaanu | Datta-kripaa aagalee ||

## Ovee 44

ऐसे उभयतांचे भाषण । झालिया मिरवलें समाधान । म्हणती योग्य आलें घडून । तुम्ही आम्हां भेटलां ॥

### Transliteration

Aise ubhayataanche bhaashanu | Jhaaliyaa miravale samaadhaanu | Mhanatee yogya aale ghadunu | Tumhee aamhaa bhetalaa ||

## Ovee 45

याउपरी कानिफाचित्तीं । कामना उदेली एका अर्थी । की मच्छिंद्र गुरु गोरक्षाप्रती । दत्तवरदें मिरवला ॥

### Transliteration

Yauparee Kaanipha-chittee | Kaalmanaa udelee ekaa arthee | Kee Machchindra guru Gorakshaa-pratee | Datta-varade miravalaa ||

## Ovee 46

तरी दत्तकृपेचें अनुसंधान । कैसें लाधलें विद्यारत्न । कीं कवणरुपीं सहजदर्शन । जगामाजी मिरवती ॥

### Transliteration

Taree Datta-kripe-che anusandhaanu | Kaise laadhale vidyaa-ratnu | Kee kavana-rupee sahaja-darshanu | Jagaa-maajee miravatee ||

## Ovee 47

तरी याचा शोध करावा । दावूनी आपुल्या गौरवा । ऐसें योजूनि सहज भावा । दृष्टी करी भोंवतालीं ॥

### Transliteration

Taree yaachaa shodha karaavaa | Daavuunee aapulyaa gauravaa | Aise yojuni sahaja bhaavaa | Drishtee karee bhovataalee ||

## Ovee 48

तों दृष्टीसमोर आम्रवन । पक्व फळी देखिलें सधन । तें पाडाचें पक्वपण । शाखा वृक्षीं विराजल्या ॥

### Transliteration

Toh drishtee-samora aamra-vanu | Pakva phalee dekhile sadhanu | Tehee paadaache pakva-panu | Shaakhaa vrikshee viraajalyaa ||

## Ovee 49

तें पाहतां कानिफनाथ । म्हणे हे आम्रवन काय शोभत । फळें हीं मधुर शाखा व्यक्त । झोंबल्या आहेत ह्या वृक्षीं ॥

### Transliteration

Tey paahataa Kaanipha-Naathu | Mhane hey aamra-vana kaaya shobhatu | Phale hee madhura shaakhaa vyaktu | Jhombalyaa aaheta hyaa vrikshee ||

## Ovee 50

परी ऐसीं फळें सुगम दिसती । तरी भक्षण करावें वाटे चित्तीं । यावरी गोरक्ष बोले युक्ती । नको नको म्हणतसे ॥

### Transliteration

Paree aisee phale sugama disatee | Taree bhakshana karaave vaate chittee | Yavaree Goraksha bole yuktee | Nako nako mhanatase ||

## Ovee 51

याउपरी बोले कानिफा वचन । तोडूनि आणवितो शिष्य धाडून । गोरक्ष म्हणे इतुका यत्न । कासयासी करावा ॥

### Transliteration

Yauparee bole Kaaniphaa vachanu | Toduni aanavito shishya dhaadunu | Goraksha mhane itukaa yatnu | Kaasayaasee karaavaa ||

## Ovee 52

आतां शिष्य आहेत जवळी । तोडूनि आणावें त्या करकमळीं । शिष्य नसतां कोणे काळीं । मग आपण काय करावें ॥

### Transliteration

Aataa shishya aahetajavalee | Toduni aanaave tyaa kara-kamalee | Shishya nasataa kone kaalee | Maga aapana kaaya karaave ||

## Ovee 53

तरी आतां स्वतः ऐसें करावें । गुरुप्रसादें प्रताप मिरवावे । फळे तोडूनि विद्येसी गौरवावें । तुष्ट आत्मा करावा ॥

### Transliteration

Taree aataa svatah aise karaave | Guru-prasaade prataapa miravaave | Phale toduni vidyesee gauravaave | Tushta aatmaa karaavaa ||

## Ovee 54

ऐसें कानिफा ऐकूनि वचन । जरी तुमचें इच्छितें ऐसें मन । तरी आतांचि आणितों तोडून । पक्वपणीं गुरुकृपें ॥

### Transliteration

Aise Kaaniphaa aikuni vachanu | Jaree tumache ichchite aise manu | Taree aataanchi aanito todunu | Pakva-panee guru-kripe ||

## Ovee 55

मग कवळूनि भस्मचिमुटी । विभक्तास्त्र जपे होटीं । त्यावरी आकर्षण मंत्रपोटीं । प्रेरित झाला युक्तीनें ॥

### Transliteration

Maga kavaluni bhasma-chimutee | Vibhakta-astra jape hotee | Tyaa-varee aakarshana mantra-potee | Prerita jhaalaa yukteene ||

## Ovee 56

विभक्तास्त्र आकर्षणी । प्रेरितां फेकीं भस्म काननीं । तंव तीं पक्वफळें वृक्षावरुनी । पुढें आलीं सर्वत्र ॥

### Transliteration

Vibhaktaastra aakarshanee | Preritaa phekee bhasma kaananee | Tav tee pakva-phale vriksha-avarunee | Pudhe aalee sarvatru ||

## Ovee 57

मग ते शिष्यकटकासहित । फळें भक्षिती मधुर व्यक्त । भक्षिल्या पूर्ण तृप्त । क्षाळिले हात जीवनानें ॥

### Transliteration

Maga tey shishya-katakaasahitu | Phale bhakshitee madhura vyaktu | Bhakshilyaa poorna triptu | Kshaalile haata jeevanaane ||

## Ovee 58

ऐसे झालिया पूर्णप्रकरणीं । गोरक्ष विचारी ऐसें मनीं । म्हणे प्रताप दाविला मजलागुनी । कानिफानें आपुला ॥

### Transliteration

Aise jhaaliyaa poorna-prakaranee | Goraksha vichaaree aise manee | Mhane prataapa daavilaa maja-laagunee | Kaaniphaane aapulaa ||

## Ovee 59

तरी आपण आतां यासी । दावूं विद्या चमत्कारासी । ऐसा विचार करुनि मानसीं । कानिफातें बोलतसे ॥

### Transliteration

Taree aapana aataa yaasee | Daavoo vidyaa chamatkaaraasee | Aisaa vichaara karuni maanasee | Kaaniphaate bolatase ||

## Ovee 60

म्हणे तुम्ही केला पाहुणचार । तरी उत्तरालागीं उत्तर । आणिक फळें भक्षूनि साचार । चवी रसने मिरवावी ॥

### Transliteration

Mhane tumhee kelaa paahunachaaru | Taree uttara-laagee uttaru | Aanika phale bhakshuni saachaaru | Chavee rasane miravaavee ||

## Ovee 61

ऐसे ऐकोनि तयाचे वचन । म्हणे बोललां तें फार उत्तम । तुमच्या शब्दासी करुनि मान । स्वीकारावें तैसेंचि ॥

### Transliteration

Aise aikoni tayaache vachanu | Mhane bolalaa tey phaara uttamu | Tumachyaa shabdaasee karuni maanu | Sveekaaraave taisenchi ||

## Ovee 62

मग आकर्षणशक्तीं विभक्तास्त्र । जल्पोन नाथ गोरक्ष पवित्र । तों लवंगवनींचीं फळे विचित्र । येऊनि पडलीं पुढारां ॥

### Transliteration

Maga aakarshana-shaktee vibhakta-astru | Jalpona Naatha Goraksha pavitru | Toh lavanga-vaneenchee phale vichitru | Yeuni padalee pudhaaraa ||

## Ovee 63

मग ती फळें खात जेठी । रसनेसी पडो पाहे मिठी । अहा अहा म्हणे शेवटीं । अमृतसरीं दाटले ॥

### Transliteration

Maga tee phale khaata jethee | Rasanesee pado paahe mithee | Aahaa aahaa mhane shevatee | Amrita-saree daatale ||

## Ovee 64

मग ती फळें केलिया भक्षण । शुद्धजीवनें हस्त प्रक्षाळून । बैसले आसनीं सुखें येऊन । त्यावरी बोले गोरक्ष तो ॥

### Transliteration

Maga tee phale keliyaa bhakshanu | Shuddha-jeevane hasta prakshaalunu | Baisale aasanee sukhe yeunu | Tyaa-varee bole Goraksha toh ||

## Ovee 65

म्हणे खालीं फळें उत्तम राहिलीं । परी जैसीं तैसीं करावी वहिलीं । पुन्हां योजूनि वृक्षडाहळीं । पुढें मार्गा गमावें ॥

### Transliteration

Mhane khaalee phale uttama raahilee | Paree jaisee taisee karaavee vahilee | Punhaa yojuni vriksha-daahalee | Pudhe maargaa gamaave ||

## Ovee 66

याउपरी कानिफानाथ । ऐसा कोण ब्रह्मयाचा सुत । पुन्हां निर्मोनि मूर्तिमंत । जैसें तैसें करील ॥

### Transliteration

Yauparee Kaanipha-naathu | Aisaa kona Brahmayaachaa sutu | Punhaa nirmoni moorti-mantu | Jaise taise kareelu ||

## Ovee 67

गोरक्ष म्हणे गुरुपुत्र । जो निस्सीमपणीं आहे पवित्र । त्यासी हे करणें अघटित विचित्र । कदाकाळीं नसेचि ॥

### Transliteration

Goraksha mhane guru-putru | Jo nisseema-panee aahe pavitru | Tyaasee hey karane aghatita vichitru | Kadaa-kaalee nasechi ||

## Ovee 68

तो दुसरा ब्रह्मा करील उत्पन्न । मग ऐसियाची कथा कोण । जो महीच मस्तकीं करिता धारण । तो पर्वताचे ओझे शिणे कीं ॥

### Transliteration

Toh dusaraa Brahmaaa kareela utpannu | Maga aisiyaa-chee kathaa konu | Jo maheecha mastakee karitaa dhaaranu | Toh parvataache ojhe shine kee ||

## Ovee 69

जो अर्कतेजा निवविणार । तो पावक ठिणगीनें पळे सत्वर । हृदयीं सांठवितो सप्तसागर । तो थिल्लरोदकें अटकेना ॥

### Transliteration

Jo Arka-tejaa nivavinaaru | Toh paavaka thinageene pale satvaru | Hridayee saanthavito sapta-saagaru | Toh thillarodake atakenaa ||

## Ovee 70

जो बोलकाजाचे गंभीर चातुरीं । बृहस्पतीतें मागें सारी । तों अजारक्षकाते भिवोनि अंतरीं । मौन वरील कां वाचे ॥

### Transliteration

Jo bola-kaa-jaa-che gambheera chaaturee | Brihaspateete maage saaree | Toh ajaa-rakshakaate bhivoni antaree | Mauna vareela kaa vaache ||

## Ovee 71

जो आपुलें प्रतापेंकरुनी । क्षीराब्धी करील गृहवासनी । तो तक्राकरितां सदैव सदनीं । भीक मागेल केउता ॥

### Transliteration

Jo aapule prataapen-karunee | Ksheera-abdhee kareela griha-vaasanee | Toh takraa-karitaa sadaiva sadanee | Bheeka maagela keutaa ||

## Ovee 72

कीं चक्षूचे कृपाकटाक्षें । पाषाण करी परीस जैसे । तो हेमाकरितां काय प्रत्यक्ष । आराधील धनाढ्या ॥

### Transliteration

Kee chakshooche kripaa-kataakshe | Paashaana karee pareesa jaise | Toh hemaa-karitaa kaaya pratyakshu | Aaraadheela dhanaadhyaa ||

## Ovee 73

जयाचे वचनवाग्वटी । मिरविती सकळ देवांच्या थाटी । तो आपल्या मोक्षासाठीं । आराधिना भूतासी ॥

### Transliteration

Jayaache vachana-vaagvatee | Miravitee sakala devaanchyaa thaatee | Toh aapalyaa moksha-asaathee | Aaraadhinaa bhootaasee ||

## Ovee 74

तस्मात् ब्रह्मयाची काय कथा । जो अनंतब्रह्मांडें होय निर्मिता । सर्व कर्तव्याचा कर्ता । गुरुकृपेसीं मिरवतसे ॥

### Transliteration

Tasmaatu Brahma-yaa-chee kaaya kathaa | Jo ananta-brahmaande hoya nirmitaa | Sarva kartavyaachaa kartaa | Guru-kripesee miravatase ||

## Ovee 75

नातरी मुळींच प्रौढीं । गुरु मिरवला ज्याच्या कवाडीं । तयाची दैना कोण फेडी । काबाड ओझे वाहे तो ॥

### Transliteration

Nataree muleencha praudhee | Guru miravalaa jyaachyaa kavaadee | Tayaachee dainaa kona phedee | Kabaada ojhe vahe toh ||

## Ovee 76

ऐसें ऐकतां कानिफनाथ । परम क्षोभला खचितार्थ । जैसा पावक आज्यसिंचितार्थ । कवळूं पाहे ब्रह्मांडा ॥

### Transliteration

Aise aikataa Kaanipha-Naathu | Parama kshobhalaa khachitaarthu | Jaisaa paavaka aajya-sinchita-arthu | Kavaloo paahe Brahmaandaa ||

## Ovee 77

म्हणे हो हो जाणतों तूतें । आणि तुझिया गुरुसहित । बहुसाधनीं प्रतापवंत । नरकामाजी पचतसे ॥

### Transliteration

Mhane ho ho jaanato toote | Aani tujhiyaa guru-sahitu | Bahu-saadhanee prataapa-vantu | Naraka-maajee pachatase ||

## Ovee 78

वाचे म्हणविती योगीजन । कर्म आचरती नरकपतन । सकळ स्त्रीराष्ट्र वेष्टून । भोग भोगी पापांचा ॥

### Transliteration

Vache mhanavitee yogee-janu | Karma aacharatee naraka-patanu | Sakala stree-raashtra veshtunu | Bhoga bhogee paapaanchaa ||

## Ovee 79

जितेंद्रियत्व दावावें जनीं । असोनि भोग चिंती मनीं । तया भोगवश करोनि । मेनिकानाथ होवोनि ठेला ॥

### Transliteration

**Jitendriyatva daavaave janee | Asoni bhoga chintee manee | Tayaa bhoga-vasha karoni | Menikaa-naatha hovoni thelaa ||**

## Ovee 80

तरी ठाऊक गुरु तुझा । किती बोलसी प्राज्ञी ओजा । आतां ब्रह्मयाचें करुनि हीन तेजा । ढिसाळ गोष्टी करितोसी ॥

### Transliteration

**Taree thaaooka guru tujhaa | Kitee bolasee praajnyee ojaa | Aataa Brahma-yaa-tey karuni heena tejaa | Dhisaala goshtee karitosee ||**

## Ovee 81

प्रथम गुरु तुझा काबाडी । तुझी दैना कोण फेडी । आतां सोडोनि सकळ प्रौढी । मार्गालागी क्रमी कां ॥

### Transliteration

**Prathama guru tujhaa kaabaadee | Tujhee dainaa kona phedee | Aataa sodoni sakala praudhee | Marga-laagee kramee kaa ||**

## Ovee 82

ऐसें वचन खडतर बोलणें । गोरक्षातें होतां श्रवण । मग म्हणे बोलसी आपण । चावटीपणीं हे भ्रष्टा ॥

### Transliteration

**Aise vachana khadatara bolane | Gorakshaate hotaa shravanu | Maga mhane bolasee aapanu | Chaavatee-panee hey bhrashtaa ||**

## Ovee 83

तुझा गुरु जालिंदरनाथ । प्रतापहीन दीन बहुत । दशवर्षे आजपर्यंत । नरकीं नित्य पचतसे ॥

### Transliteration

**Tujhaa guru Jaalindara-Naathu | Prataapa-heena deena bahutu | Dasha-varshe aaja-paryantu | Narakee nitya pachatase ||**

## Ovee 84

परी त्या सामर्थ्य नाहीं झालें । कीं आपण येथूनि जावें वहिलें । नृपसर्पदर्पे वेष्टिले । शक्तिहीन झालासे ॥

### Transliteration

**Paree tyaa saamarthya naahee jhaale | Kee aapana yethuni jaave vahile | Nripa-sarpa-darpe veshtile | Shakti-heena jhaalaase ||**

## Ovee 85

हेळापट्टणीं गौडबंगाल देशीं । वस्ताद मिळाला आहे त्यासी । धन्य गोपीचंद प्रतापराशी । लीदगर्तीत पचवीतसे ॥

### Transliteration

Helaa-pattanee Gauda-Bangaala deshee | Vastaada milaalaa aahe tyaasee | Dhanya Gopeechanda prataapa-raashee | Leeda-garteeta pachaveetase ||

### Ovee 86

तैसा नोहे गुरु माझा । हालवील सकळ ब्रह्मांड चोजा । शंकराचें अस्त्र ओजा । करकमळीं मिरवतसे ॥

#### Transliteration

Taisaa nohe guru maajhaa | Haalaveela sakala Brahmaanda chojaa | Shankaraache astra ojaa | Kara-kamalee miravatase ||

### Ovee 87

अष्टभैरव महादारुण । अजिंक्य देवांदानवांकारण । त्यांसी बळें करुनि कंदन । शरणागत आणिलें ॥

#### Transliteration

Ashta-Bhairava mahaa-daarunu | Ajinkya devaa-daanavaa-kaaranu | Tyaansee bale karuni kandanu | Sharana-aagata aanile ||

### Ovee 88

पाहे केवढा मारुतसुत । जेणें विजयी केला रघुनाथ । तया मस्तकीं देऊनि पर्वत । उभा केला स्तंभापरी ॥

#### Transliteration

Paahe kevadhaa Maaruta-sutu | Jene vijayee kelaa Raghu-Naathu | Tayaa mastakee deuni parvatu | Ubhaa kelaa stambha-aparee ||

### Ovee 89

वीरभद्र प्रतापतरणी । देवदानवां अजिंक्य करणी । तयाचा प्राण कंठी आणुनी । शरणागत तो केला ॥

#### Transliteration

Veera-Bhadra prataapa-taranee | Devaa-daanavaa ajinkya karani | Tayaachaa praana kanthee aanunee | Sharanaagata toh kelaa ||

### Ovee 90

द्वादशकळी तीव्र आदित्य । तयाचा उलथोनि पाडिला रथ । सकळ देव शरणागत । होऊनि लोटले पायासी ॥

#### Transliteration

Dvaadasha-kalee teevra Aadityu | Tayaachaa ulathoni paadilaa rathu | Sakala deva sharanaagatu | Houni lotale paayaasee ||

### Ovee 91

तरी प्रतापी गुरु ऐसा । भक्त सोडवीत नरकक्लेशा । तयाच्या वरदकृपें ऐसा । आतांचि पाहें हे भ्रष्टा ॥

#### Transliteration

**Taree prataapee guru aisaa | Bhakta sodaveeta naraka-kleshaa | Tayaa-chyaa varada-kripe aisaa | Aataanchi paahe hey bhrashtaa ||**

## Ovee 92

मग घेऊनि भस्मचिमुटी । मंत्रप्रयोग बोले होटीं । संजीवनी ते पीयूषथाटी । सकळ फळांते मिरवली ॥

### Transliteration

**Maga gheuni bhasma-chimutee | Mantra-prayoga bole hotee | Sanjeevanee tey peeyoosha-thaatee | Sakala phalaante miravalee ||**

## Ovee 93

ऐसीं सकळ प्रयोगीं फळें संपूर्ण । जैसीं तैसीं ठेली होऊन । तें कानिफनाथ पाहून । मनीं शंकीत पैं झाला ॥

### Transliteration

**Aisee sakala prayogee phale sampoornu | Jaise taisee thelee hounu | Tey Kaanipha-Naatha pahunu | Manee shankeeta pai jhaalaa ||**

## Ovee 94

योजूनि सर्वे मुख वोठीं । विस्मय करीत आपुले पोटीं । म्हणे धन्य हा प्रतापजेठी । जगामाजी मिरविला ॥

### Transliteration

**Yojuni sarve mukha vothee | Vismaya kareeta aapule potee | Mhane dhanya haa prataapa-jethee | Jagaa-maajee miravilaa ||**

## Ovee 95

सकळ टाकूनि विरुद्ध भाषण । धांवोनि दिधलें आलिंगन । म्हणे धन्य तूं एक निपुण । गुरुपुत्रता मिरविशी ॥

### Transliteration

**Sakala taakuni viruddha bhaashanu | Dhaavoni didhale aalinganu | Mhane dhanya too eka nipunu | Guru-putrataa miravishee ||**

## Ovee 96

परी ऐशा बोलतां विरुद्ध बोला । मातें सर्वज्ञ लाभ झाला । शोधित फिरलों जालिंदराला । ठाव लाधला तुजपासीं ॥

### Transliteration

**Paree aishaa bolataa viruddha bolaa | Maate sarvajnya laabha jhaalaa | Shodhita phiralo Jaalindara-laa | Thaava laadhalaa tujapaasee ||**

## Ovee 97

यापरी गोरक्ष बोले वचन । हें बोलिलासी अति अप्रमाण । माझा लाभ तुजकारण । तुझा लाभ मज झाला ॥

### Transliteration

Yaaparee Goraksha bole vachanu | Hey bolilaasee ati apramaanu | Maajhaa laabha tuja-kaaranu | Tujhaa laabha maja jhaalaa ||

## Ovee 98

ते बोल नव्हे वाईट । दाविते झाले मार्ग चोखट । गुप्तगुरुचें उघडूनि कपाट । मार्गदिवटा पैं केला ॥

### Transliteration

Tey bola navhe vaaeetu | Daavite jhaale maarga chokhatu | Gupta-guru-che ughaduni kapaatu | Maarga-divataa pai kelaa ||

## Ovee 99

तरी आतां उत्तम झालें । दृष्टीं पाहूं गुरुपाउलें । ऐसें वदूनि प्रीतीं नमिलें । एकमेकां तें वेळा ॥

### Transliteration

Taree aataa uttama jhaale | Drishtee paahoo guru-paaule | Aise vaduni preetee namile | Ekameka tey velaa ||

## Ovee 100

याउपरी गौरनंदन । स्पर्शास्त्र मुखीं जल्पून । वृक्षांदेठीं फळें नेऊन । जेथील तेथें जडियेलीं ॥

### Transliteration

Yauparee Gaura-nandanu | Sparsha-astra mukhee jalpunu | Vriksha-andethee phale neunu | Jetheela tethe jadiyelee ||

## Ovee 101

मग पुन्हां करोनि नमनानमन । प्रांजळ वर्णित वर्तमान । एकमेकांतें विचारुन । आदेश म्हणवूनि जाताती ॥

### Transliteration

Maga punhaa karoni namanaanamanu | Praanjala varnita vartamaanu | Ekamekaante vichaarunu | Aadesha mhanavuni jaataatee ||

## Ovee 102

गोरक्ष चालिला स्त्रीदेशांत । कानिफा गौडबंगाली जात । हेळापट्टण लक्षूनियां पंथ । कूच मुक्काम साधीतसे ॥

### Transliteration

Goraksha chaalilaa Stree-deshaantu | Kaaniphaa Gauda-bangaalee jaatu | Helaapattana lakshuni-yaa panthu | Koocha mukkaama saadheetase ||

## Ovee 103

परी तीव्र होऊनि अति चित्तीं । म्हणे जातांचि भस्म करीन नृपती । अहा जालिंदर गुरुमूर्ती । दुखविली नष्टानें ॥

### Transliteration

Paree teevra houni ati chittee | Mhane jaataanchi bhasma kareena nripatee | Ahaa Jaalindara guru-moortee | Dukhavilee nashtaane ||

## Ovee 104

ऐसें म्हणोनि वारंवार । परम क्रोधाचा वैश्वानर । शिखा डुलवी स्वअंगावर । अहाळूनि पाडावया ॥

### Transliteration

Aise mhanoni vaaram-vaaru | Parama krodha-achaa vaishvaanaru | Shikhaa dulavee sva-angaavaru | Aaaluni paadaavayaa ||

## Ovee 105

तन्न्यायें तीव्रमती । चित्तकुंडी पावकस्थिती । प्रदीप करोनि नृपआहुती । इच्छूनियां जातसे ॥

### Transliteration

Tannyaye teevra-matee | Chitta-kundee paavaka-sthitee | Pradeep karoni nripa-aahutee | Ichchuniyaa jaatase ||

## Ovee 106

तच्छिष्यकटकथाटी । गमन करितां वाटोवाटीं । तंव हेळापट्टण काननपुटीं । जाऊनियां पोहोंचला ॥

### Transliteration

Tach-chishya-kataka-thaatee | Gamana karitaa vaato-vaatee | Tava Helaapattana kaanana-putee | Jauniyaa pohonchalaa ||

## Ovee 107

तो वृत्तांत रायासी कळला । कानिफा आले गांवाला । मग परिवारासहित गोपीचंद वहिला । सवें सामोरा जातसे ॥

### Transliteration

Toh vrittaanta raayaasee kalalaa | Kaaniphaa aale gaavaalaa | Maga parivaara-asahita Gopeechanda vahilaa | Save saamoraa jaatase ||

## Ovee 108

चित्तीं म्हणे मम वैभवा । योग्य दिसे महानुभावा । तरी गुरु हाचि करावा । कायावाचाभावानें ॥

### Transliteration

Chittee mhane mama vaibhavaa | Yogya dise mahaa-nubhaavaa | Taree guru haachi karaavaa | Kayaa-vaachaa-bhaavaane ||

## Ovee 109

सातशें शिष्यकटक भारी । पूर्णयोगी ब्रह्मचारी । गज वाजी स्यंदनी स्वारी । जगामाजी मिरवतसे ॥

### Transliteration

Saatashe shishya-kataka bhaaree | Poorna-yogee Brahmachaaree | Gaja vaajee syandanee svaaree | Jagaa-maajee miravatase ||

## Ovee 110

सिद्ध करुनि चमूभार । शिबिकासनें तुरंग अपार । अन्य मंडळी वीर झुंजार । रायासवें मिरविले ॥

### Transliteration

Siddha karuni chamoo-bhaaru | Shibikaasane turanga apaaru | Anya mandalee veera jhunjaaru | Raayaa-save miravile ||

## Ovee 111

रायमस्तकीं एकशत । चंद्राकृती देदीप्यवंत । ऐसीं छत्रें वर्णिता बहुत । वाढेल ग्रंथ आगळा ॥

### Transliteration

Raaya-mastakee eka-shatu | Chandraa-kritee daedeepyavantu | Aisee chatre varnitaa bahutu | Vaadhela grantha aagalaa ||

## Ovee 112

एक सहस्त्र सातशें मिती । बरोबरीचे सरदार असती । तयांचीं छत्रें पंच असती । चंद्रार्की मिरवत ॥

### Transliteration

Eka sahastra saatashe mitee | Barobareeche saradaara asatee | Tayaanchee chatre pancha asatee | Chandra-arkee miravatu ||

## Ovee 113

हेमतगटी झालरा शिल्पयुक्तीं । छत्रकळसाची अपार दीप्ती । रत्नखचित अर्का म्हणती । तेज सांडी तूं आपुले ॥

### Transliteration

Hema-tagatee jhaalaraa shilpa-yuktee | Chatra-kalasaachee apaara deeptee | Ratna-khachita Arkaa mhanatee | Teja saandee too aapule ||

## Ovee 114

ऐशा संपत्तिसंभारेसी । ठेंगणें भाविती अमरपदासी । मार्गी चालतां मांत्रिकासी । पाचारी तो नृपनाथ ॥

### Transliteration

Aishaa sampattee-sambhaaresee | Thengane bhaavitee amara-padaasee | Maargee chalataa maantrikaasee | Pachaaree toh nripa-naathu ||

## Ovee 115

म्हणती प्रारब्धयोगेंकरुन । येथें पातलें सिद्धरत्न । तरी याचा अनुग्रह घेऊन । ईश्वरभक्तीं परिधानूं ॥

### Transliteration

Mhanatee praarabdha-yogen-karunu | Yethe paatale siddha-ratnu | Taree yaachaa anugraha gheunu | Eeshvara-bhaktee paridhaanoo ||

## Ovee 116

हा श्रीगुरु आहें योग्य मातें । माझी संपत्ती भूषणभरतें । जगामाजी दिसे सरितें । योगायोग्य उभयतीं ॥

### Transliteration

Haa Shree-guru aahe yogya maate | Maajhee sampattee bhooshana-bharate | Jagaa-maajee dise sarite | Yogaayogya ubhayatee ||

## Ovee 117

नातरी गुरु मम मातेनें । योजिला होता कंगालहीन । रत्नपति काच आणून । भूषणांते मिरवीतसे ॥

### Transliteration

Naataree guru mama maatene | Yojilaa hotaa kangaala-heenu | Ratna-pati kaacha anunu | Bhooshanaante miraveetase ||

## Ovee 118

कीं कल्पतरुच्या बागायतीं । कंटक तरु बाभूळवस्ती । कीं अर्कचंद्राचे मध्यपंक्ती । काजव्यानें मिरवावें ॥

### Transliteration

Kee Kalpataru-chyaa baagaayatee | Kantaka taru baabhoola-vastee | Kee Arka-chandraa-che madhya-panktee | Kajavyaane miravaave ||

## Ovee 119

मी भूप माझे पंक्ती । भूपती असावा सर्वज्ञमूर्ती । घृतशर्करा दुग्धसरितीं । लवण कैसें वाढावें ॥

### Transliteration

Mee bhoopa maajhe panktee | Bhoopatee asaavaa sarva-jnya-moortee | Ghrita-sharkaraa dugdha-saritee | Lavana kaise vaadhaave ||

## Ovee 120

अमंगळ गल्ली कुश्र्चल स्थान । बहुत ज्ञानी पिशाचसमान । तो गुरु मातें मम मातेनें । जालिंदर योजिला ॥

### Transliteration

Amangala gallee kushrchala sthaanu | Bahuta jnyaanee pishaacha-samaanu | Toh guru maate mama maatene | Jaalindara yojilaa ||

## Ovee 121

अहो ती योग्य नसे संगत । काय केलें स्त्रीजातींत । परी आतां उदेले उचिताउचित । गुरु कानिफा आम्हांसी ॥

### Transliteration

Aho tee yogya nase sangatu | Kaaya kele stree-jaateentu | Paree aataa udele uchitaauchitu | Guru Kaaniphaa aamhaansee ||

## Ovee 122

ऐसें वदूनि मंत्रिकासी । राव जातसे कटकप्रदेशी । घेऊनि सवें संभारासी । षोडशोपचार आदरें ॥

### Transliteration

Aise vaduni mantrikaasee | Raava jaatase kataka-pradeshee | Gheuni save sambhaaraasee | Shodasha-upachaara aadare ||

## Ovee 123

ऐसेपरी कटकथाटीं । राव जाय सुगम वाटीं । त्या मार्गी योगींद्र जेठी । जाऊनियां मिळाला ॥

### Transliteration

Aise-paree kataka-thaatee | Raava jaaya sugama vaatee | Tyaa maargee yogeendra jethee | Jauniyaa milaalaa ||

## Ovee 124

परी येता देखतांचि गोपीचंद । हृदयीं धडाडला अपार क्रोध । परी विवेक अर्गळा अपार । तेणें अक्रोध मनामाजी संचरला ॥

### Transliteration

Paree yetaa dekhataanchi Gopeechandu | Hridayee dhadaadalaa apaara krodhu | Paree viveka argalaa apaaru | Tene akrodha manaamaajee sancharalaa ||

## Ovee 125

आतांचि शापुनि करिन भस्म । परी कार्य तैसेंचि राहील सुगम । कोठें श्रीगुरु योगद्रुम । मिरवला तो कळेना ॥

### Transliteration

Aataanchi shaapuni karina bhasmu | Paree kaarya raaheela taisenchi sugamu | Kothe Shree-guru yoga-drumu | Miravalaa toh kalenaa ||

## Ovee 126

परी याचे हातीं कार्य सुगम । उरकोनि घ्यावा मनोधर्म । आधीं पाहूनि गुरुचरंपद्म । शासनातें मग ओपूं ॥

### Transliteration

Paree yaache haatee kaarya sugamu | Urakoni ghyaavaa mano-dharmu | Aadhee pahuni guru-charana-padmu | Shaasanaate maga opoo ||

## Ovee 127

ऐसा विचार करुनि चित्तीं । स्तब्ध राहिला योगींद्र जती । क्रोधानळा समूळ शांती । बोधलक्ष्मी स्थापीतसे ॥

### Transliteration

Aisaa vichaara kaaruni chittee | Stabdha raahilaa yogeendra jatee | Krodha-analaa samoola shaantee | Bodha-lakshmee sthaapeetase ||

## Ovee 128

जैसे शस्त्रास्त्री निपुण । जेवीं रक्षिती प्रतापवान । परी कार्यसंबंधीं देदीप्यमान । दर्शविती लोकांतें ॥

### Transliteration

Jaise shastra-astree nipunu | Jevee rakshitee prataapa-vaanu | Paree kaarya-sambandhee daedeepya-maanu | Darshavitee lokaante ||

## Ovee 129

तरी प्रथम श्रीगुरुमूर्ती । प्रत्यक्ष करावी याचे हातीं । मग क्रोधानळासी दुस्तर आहुती । अंगीकारूनि गोपीचंद योजावा ॥

### Transliteration

Taree prathama Shree-guru-moortee | Pratyaksha karaavee yaache haatee | Maga krodha-analaasee dustara aahutee | Angee-kaaruni Gopeechanda yojaavaa ||

## Ovee 130

ऐसिये विचारीं शब्दबोधें । कानिफा राहिला स्तब्ध । येरीकडे गोपीचंद । चरणावरी लोटला ॥

### Transliteration

Aisiye vichaaree shabda-bodhe | Kaaniphaa raahilaa stabdhu | Yeree-kade Gopeechandu | Charanaa-varee lotalaa ||

## Ovee 131

उभा राहिला समोर दृष्टीं । नम्रोत्तर बोले होटीं । जोडोनियां करसंपुटीं । विनवणी विनवीतसे ॥

### Transliteration

Ubhaa raahilaa samora drishtee | Namrottara bole hotee | Jodoniyaa kara-samputee | Vinavanee vinaveetase ||

## Ovee 132

हे महाराजा दैवयोगा । मज आळशावरी गंगा । वोळलासी कृपाओघा । अनाथा सनाथ करावया ॥

### Transliteration

Hey Mahaaraajaa daiva-yogaa | Maja aalashaavaree Gangaa | Volalaasee kripaa-oghaa | Anaathaa sanaatha karaavayaa ||

## Ovee 133

तुम्ही कृपाळू संतसज्जन । दयाभांडार शांतिरत्न । ज्ञानविज्ञान आस्तिककर्म । गृहस्थांसीं कल्पावें ॥

### Transliteration

Tumhee kripaaloo santa-sajjanu | Dayaa-bhaandaara shaanta-ratnu | Jnyaana-vijnyaana aastika-karmu | Grihasthaansee kalpaave ||

## Ovee 134

ब्रह्मी पावला तत्त्वतां । षड्गुणासी विषयां दभितां । सकळ भोगूनि अकर्ता । मिरवतसां जगामाजी ॥

### Transliteration

Brahmee paavalaa tattvataa | Shad-gunaasee vishayaa dabhitaa | Sakala bhoguni akartaa | Miravatasaa jagaa-maajee ||

## Ovee 135

आणि जगाच्या विषयतिमिरीं । ज्ञानदिवटी तेजारी । मिरवूनि सुख सनाथपरी । दाविते झाला महाराजा ॥

### Transliteration

Aani jagaa-chyaa vishaya-timiree | Jnyaana-divatee tejaaree | Miravuni sukha sanaatha-paree | Daavite jhaalaa Mahaaraajaa ||

## Ovee 136

ऐसे साधक याचकमणी । तुम्ही कल्पतरु कल्पनापूर्णी । ऐसिये स्थिति जान्हवी जीवनी । बोळविलीत मजवरुती ॥

### Transliteration

Aise saadhaka yaachaka-manee | Tumhee Kalpataru kalpanaa-poornee | Aisiye sthiti jaanhavee jeevanee | Bolavileeta maja-varu-tee ||

## Ovee 137

परी श्रीरायाचें वागुत्तर । ऐकूनि कानिफा मनोहर । तेणें चित्तशक्तितरुवर । आनंदशांती मिरवली ॥

### Transliteration

Paree shree-raayaa-che vaaguttaru | Aikuni Kaaniphaa manoharu | Tene chitta-shakti-taru-varu | Aananda-shaantee miravalee ||

## Ovee 138

देहीं क्रोधाचा वैश्वानर । पेटवा घेत होता अपार । तरी रावउत्तराचें सिंचननीर । होतांचि शांति वरियेली ॥

### Transliteration

Dehee krodha-achaa vaishvaanaru | Petavaa gheta hotaa apaaru | Taree raava-uttaraache sinchana-neeru | Hotaanchi shaanti variyelee ||

## Ovee 139

मग रायासी धरुनि करी । बैसविला स्वशेजारी । मग बोलत वागुत्तरीं । कुशळ असा कीं महाराजा ॥

### Transliteration

**Maga raayaasee dharuni karee | Baisavilaa sva-shejaaree | Maga bolata vaagutteeree | Kushala asaa kee Mahaaraajaa ||**

## Ovee 140

म्हणे राया अनुचित केलें । परी तव भाग्य सबळ पाहिले । तेणेंकरुनि शांतीतें वरिले । मम मानसें महाराजा ॥

### Transliteration

**Mhane raayaa anuchita kele | Paree tave bhaagya sabala paahile | Tenekaruni shaanteete varile | Mama maanase Mahaaraajaa ||**

## Ovee 141

नातरी अनर्थासी गांठी । पडत होती प्राणासी मिठी । परी तव भाग्यउत्तराचे देठीं । शांतिफळें मिरवलीं ॥

### Transliteration

**Naataree anarthaasee gaanthee | Padata hotee praanaasee mithee | Paree tava bhaagya-uttaraache dethee | Shaanti-phale miravalee ||**

## Ovee 142

तरी आतां असो कैसें । वेगीं चाल पट्टणास । तेथें सकळ इतिहास । निवेदीन तुज राया ॥

### Transliteration

**Taree aataa aso kaise | Vegee chaala pattanaasu | Tethe sakala itihaasu | Nivedeena tuja raayaa ||**

## Ovee 143

मग बैसूनि शिबिकासनीं । काटकासह ग्रामासी येवोनि । राये राजसदना आणोनी । कनकासनीं वाहिला ॥

### Transliteration

**Maga baisuni shibika-asanee | Kaataka-asaha graamaasee yevoni | Raye raaja-sadanaa aanonee | Kanaka-aasanee vaahilaa ||**

## Ovee 144

वाहिला तरी प्रीतीकरुनी । षोडशोपचारें पूजिला मुनी । हेमरत्नीं आणि वस्त्रभूषणीं । नम्रवाणी बोलतसे ॥

### Transliteration

**Vaahilaa taree preetee-karunee | Shodasha-upachaare poojilaa Munee | Hema-ratnee aani vastra-bhooshanee | Namra-vaanee bolatase ||**

## Ovee 145

हे महाराजा योगसंपत्ती । कामना वेधली माझे चित्तीं । अनुग्रहीं चोज घेऊनि निगुतीं । सनाथपणी मिरवावें ॥

### Transliteration

Hey Mahaaraajaa yoga-sampattee | Kaamanaa vedhalee maajhe chittee | Anugrahee choja gheuni nigutee | Sanaatha-panee miravaave ||

## Ovee 146

ऐसी वेधककामना चित्तीं । प्रथम भागीं निरवत होती । त्यांत उदेली कोपयुक्ती । वैश्वानरशिखा ते ॥

### Transliteration

Aisee vedhaka-kaamanaa chittee | Prathama bhaagee niravata hotee | Tyaanta udelee kopa-yuktee | Vaishvaanara-shikhaa tey ||

## Ovee 147

तेणें आनंदोनि उदयाचा तरु । वोळलासे योगधीरु । मग पुढें वासनाफळकारु । प्रेरावयातें पावला ॥

### Transliteration

Tene aanandoni udaya-achaa taru | Volalaase yoga-dheeru | Maga pudhe vaasanaa-phalakaaru | Preraavayaate paavalaa ||

## Ovee 148

नृप म्हणे अर्थ उघडून । चित्तीं मिरवा समाधान । नातरी भययुक्त भिरड पूर्ण । चित्ततरुतें स्पर्शीतसे ॥

### Transliteration

Nripa mhane artha ughadunu | Chittee miravaa samaadhaanu | Naataree bhaya-yukta bhirada poornu | Chitta-tarute sparsheetase ||

## Ovee 149

तरी प्रांजळ करुनि मातें । कृपें ओपूनि अनुग्रहातें । आपुला साह्य म्हणोनि सरतें । तिन्हीं लोकीं मिरवावे ॥

### Transliteration

Taree praanjala karuni maate | Kripe opuni anugrahaate | Aapulaa saahya mhanoni sarate | Tinhee lokee miravaave ||

## Ovee 150

कानिफा म्हणे नृपा ऐक । मम अनुग्रहाचें उत्तम दोंदिक । घेऊं पाहसी भावपूर्वक । परी तुवा भाव नासिला ॥

### Transliteration

Kaaniphaa mhane nripaa aiku | Mama anugrahaache uttama dondiku | Gheoo paahasee bhaava-poorvaku | Paree tuvaa bhaava naasilaa ||

## Ovee 151

जैसें दुग्ध पवित्र गोड । परी लवण स्पर्शितां परम द्वाड । तेवीं तूतें घडूनि बिघड । आलें आहे महाराजा ॥

### Transliteration

Jaise dugdha pavitra godu | Paree lavana sparshitaa parama dvaadu | Tevee toote ghaduni bighadu | Aale aahe Mahaaraajaa ||

## Ovee 152

अरे माझा अनुग्रह घ्यावया पाहसी । परी ज्याचा अनुग्रह मजसी । तो तूं स्वामी महागर्तेसी । अश्वविष्ठेंत स्थापिला ॥

### Transliteration

Arey maajhaa anugraha ghyaavayaa paahasee | Paree jyaachaa anugraha majasee | Toh too svaamee mahaa-gartesee | Ashva-vishthenta sthaapilaa ||

## Ovee 153

परी तुझें आयुष्य लाग । पूर्वपुण्याचा होता योग । म्हणोनि क्रोधानळ मग । शांतिदरीं दडाला हो ॥

### Transliteration

Paree tujhe aayushya laagu | Poorva-punyaachaa hotaa yogu | Mhanoni krodha-anala magu | Shaanti-daree dadaalaa ho ||

## Ovee 154

नातरी महाराज जालिंदर । प्रळयकाळीचा वैश्वानर । तुझें वैभवाचें अपार नीर । भस्म करिता क्षणार्धें ॥

### Transliteration

Naataree Mahaaraaja Jaalindaru | Pralaya-kaaleechaa vaishvaanaru | Tujhe vaibhavaache apaara neeru | Bhasma karitaa kshana-ardhe ||

## Ovee 155

जयाच्या प्रतापाची सरी । कोण करी बोल वागुत्तरीं । जेणे स्वर्गदेवतांची थोरी । झाडोझाडीं लाविली ॥

### Transliteration

Jayaachyaa prataapa-achee saree | Kona karee bola vaaguttaree | Jene svarga-devataanchee thoree | Jhaado-jhaadee laavilee ||

## Ovee 156

मग साद्यंत वराची कथा । तया नृपातें सांगतां । तेणेही सकळ ऐकूनि वार्ता । भय उदेलें चित्तांत ॥

### Transliteration

Maga saadyanta varaachee kathaa | Tayaa nripaate saangataa | Tene-hee sakala aikuni vaartaa | Bhaya udele chittaantu ||

## Ovee 157

अंगीं रोमांच आले दाटून । शरीरी कापरें दाटलें पूर्ण । मग धरोनि त्याचे चरण । नम्रपणें विनवीतसे ॥

### Transliteration

Angee romaancha aale daatunu | Shareeree kaapare daatale poornu | Maga dharoni tyaache charanu | Namra-pane vinaveetase ||

## Ovee 158

म्हणे महाराजा योगवित्त । घडूनि आलें ते अनिचित । तरी आतां क्षमा उचित । प्रसाद करा दासावरी ॥

### Transliteration

Mhane Mahaaraajaa yoga-vittu | Ghaduni aale tey anichitu | Taree aataa kshamaa uchitu | Prasaada karaa daasaavaree ||

## Ovee 159

या ब्रह्मांडमंडपांत । मजएवढा कोणी नाही पतित । अहा ही करणी अघटित । घडूनि आली मजलागीं ॥

### Transliteration

Yaa Brahmaanda-mandapaantu | Maja-evadhaa konee naahee patitu | Ahaa hee karanee aghatitu | Ghaduni aalee majalaagee ||

## Ovee 160

परी सदैव मायेवरी । शांती धरावी हृदयांतरीं । बहु अन्याय होतां किशोरी । अहितातें टेकेना ॥

### Transliteration

Paree sadaiva maayevaree | Shaantee dharaavee hridaya-antaree | Bahu anyaaya hotaa kishoree | Ahitaate tekenaa ||

## Ovee 161

तुम्ही संत दयावंत । घेतां जगाचे बहु आघात । अमृतापम मानूनि चित्त । कृपा उचित दर्शवितां ॥

### Transliteration

Tumhee santa dayaavantu | Ghetaa jagaache bahu aaghaatu | Amrita-apama maanuni chittu | Kripaa uchita darshavitaa ||

## Ovee 162

जैसा झाडा घातला घाव । एकीं लावणी केली अपूर्व । परि उभयतां एकचि छाव । मिरवूं शके जैशी कां ॥

### Transliteration

Jaisaa jhaadaa ghaatalaa ghaavu | Ekee laavanee kelee apoorvu | Pari ubhayataa ekachi chaavu | Miravoo shake jaishee kaa ||

## Ovee 163

कीं सरितापात्रीं नीरओघीं । धुती पूजिती मळसंगी । परी एकचि तों उभयप्रसंगीं । मिरवली कीं सरिता ते ॥

### Transliteration

Kee saritaa-paatree neera-oghee | Dhutee poojitee mala-sangee | Paree ekachi toh ubhaya-prasangee | Miravalee kee saritaa tey ||

## Ovee 164

कीं तस्करा होतां घरांत रिघावा । त्यासही प्रकाश देई जैसा दिवा । तन्न्याय संतभावा । मिरवूं जात महाराजा ॥

### Transliteration

Kee taskaraa hotaa gharaanta righaavaa | Tyaasahee prakaasha daee jaisaa divaa | Tannyaya santa-bhaavaa | Miravoo jaata Mahaaraajaa ||

## Ovee 165

तरी आतां असो कैसें । क्षमावोढण करीं आम्हांस । दुष्कृतसरिता प्रवाहीं विशेष । ओढूनि काढीं महाराजा ॥

### Transliteration

Taree aataa aso kaise | Kshamaa-vodhana karee aamhaansu | Dushkrita-saritaa pravaahee visheshu | Odhuni kaadhee Mahaaraajaa ||

## Ovee 166

ऐसें ऐकूनि तयाचें वचन । ना भी म्हणे गजकर्णनंदन । मग रायालागीं सवें घेऊन । स्वशिबिरातें पातला ॥

### Transliteration

Aise aikuni tayaache vachanu | Naa bhee mhane Gaja-karna-nandanu | Maga raayaa-laagee save gheunu | Sva-shibiraate paatalaa ||

## Ovee 167

परी हा वृत्तांत ऐकूनि । परिचारिका धांवल्या तेथूनी । त्यांनीं जाऊनि सकळ युवतीलागोनी । मैनावतीतें सांगितलें ॥

### Transliteration

Paree haa vrittaanta aikuni | Parichaarikaa dhaavalyaa tethuunee | Tyaannee jauni sakala yuvatee-laagonee | Mainaaveteete saangitale ||

## Ovee 168

हे माय वो भक्तिसंपादनी । जालिंदरगुरु तुम्हांलागुनी । परी तयाची रायें विपत्ती करुनी । महीगर्तेत मिरविला ॥

### Transliteration

Hey Maaya vo bhakti-sampaadanee | Jaalindara-guru tumhaa-laagunee | Paree tayaachee raaye vipattee karunee | Mahee-garte miravilaa ||

## Ovee 169

तेंही अश्वविष्ठेत । टाकिला आहे दशवरुषांत । ही राजदरबारा ऐकूनि मात । तुम्हां आम्हीं निवेदिलें ॥

### Transliteration

Tehee ashva-vishthetu | Taakilaa aahe dasha-varushaantu | Hee raaja-darabaaraa aikuni maatu | Tumhaa aamhee nivedile ||

## Ovee 170

म्हणाल कैसी कळली मात । तरी जालिंदराचा आला सुत । अपार वैभव कानिफनाथ । विद्यार्णव दुसरा ॥

### Transliteration

Mhanaala kaisee kalalee maatu | Taree Jaalindaraachaa aalaa sutu | Apara vaibhava Kaanipha-Naathu | Vidya-arnava dusaraa ||

## Ovee 171

तरी तयाचें वैभव पाहून । शेवटी नटला आपुला नंदन । परी जालिंदराचें वर्तमान । श्रुत केलें तेणेंचि ॥

### Transliteration

Taree tayaache vaibhava pahunu | Shevatee natalaa aapulau nandanu | Paree Jaalindaraache vartamaanu | Shruta kele tenenchi ||

## Ovee 172

आता राव तयाचे शिबिरीं । गेला आहे सहपरिवारीं । तेथे घडेल जैसेपरी । तैसे वृत्त सांगूं पुढें ॥

### Transliteration

Aataa raava tayaache shibiree | Gelaa aahe saha-parivaaree | Tethe ghadela jaise-paree | Taise vritta saangoo pudhe ||

## Ovee 173

ऐसें सांगता युवती । हृदयीं क्षोभली मैनावती । परी पुत्रमोहाची संपत्ती । चित्तझुलारी हेलावे ॥

### Transliteration

Aise saangataa yuvatee | Hridayee kshobhalee Mainaavatee | Paree putra-moha-achee sampattee | Chitta-jhulaaree helaave ||

## Ovee 174

येरीकडे नृपनाथ । मुनिशिबिरा जाऊनि त्वरित । उत्तम अगारीं अनन्य पदार्थ । इच्छेसमान भरियेले ॥

### Transliteration

Yereekade nripa-naathu | Muni-shibiraa jauni tvaritu | Uttama agaaree ananya padaarthu | Ichche-samaana bhariyele ||

## Ovee 175

सदा सन्मुख कर जोडून । अंगे धांवे कार्यासमान । जेथील तेथें अर्थ पुरवून । संगोपन करीतसे ॥

### Transliteration

**Sadaa sanmukha kara jodunu | Ange dhaave kaaryaa-samaanu | Jetheela tethe artha puravunu | Sango-panan kareetase ||**

## Ovee 176

जैसे दुर्वासा अतिथी सकळ । सेवे आराधी कौरवपाळ । तन्न्याय हा भूपाळ । नाथालागीं संबोखी ॥

### Transliteration

**Jaise Durvaasaa atithee sakalu | Seve aaraadhee kaurava-paalu | Tannyaaya haa bhoopaalu | Naathaa-laagee sambokhee ||**

## Ovee 177

असो ऐसे सेवेप्रकरणीं । अस्तास गेला वासरमणी । मग रायातें आज्ञा देऊनी । बोळविला सदनातें ॥

### Transliteration

**Aso aise seve-prakaranee | Astaasa gelaa vaasara-manee | Maga raayaate aajnyaa deuunee | Bolavilaa sadanaate ||**

## Ovee 178

राव पातला सदनाप्रती । परी येतांचि वंदिली मैनावती । मग झाला वृत्तांत तियेप्रती । निवेदिला रायानें ॥

### Transliteration

**Raava paatalaa sadanaa-pratee | Paree yetaanchi vandilee Mainaavatee | Maga jhaalaa vrittaanta tiye-pratee | Nivedilaa raayaane ||**

## Ovee 179

वृत्तांत निवेदूनि तिजसी । तुवां जाऊनि शिबिरासी । युक्तिप्रयुक्तीं बोधूनि त्यासी । महाविघ्ना निवटावें ॥

### Transliteration

**Vrittaanta niveduni tijasee | Tuva jauni shibiraasi | Yukti-prayuktee bodhuni tyaasee | Mahaa-vighnaa nivataave ||**

## Ovee 180

मग अवश्य बोलूनि मैनावती । शिबिरा आसनीं जाऊं पाहती । शीघ्र येऊनि शिबिराप्रती । कानिफानाथ मिरवला ॥

### Transliteration

**Maga avashya boluni Mainaavatee | Shibiraa aasanee jaaoo paahatee | Sheeghra yeuni shibiraa-pratee | Kaanipha Naatha miravalaa ||**

## Ovee 181

वंदूनि निकट बैसली तेथ । म्हणे महाराजा गुरुनाथ । कोण तुम्हीं वरिला अर्थ । नाथपंथी मिरवावया ॥

### Transliteration

Vanduni ???? baisalee tethu | Mhane Mahaaraajaa guru-Naathu | Kona tumhee varilaa arthu | Natha-panthee miravaavayaa ||

## Ovee 182

तरी या नाथपंथिका । मीही मिरवतें महीलोका । तरी मम मौळीं वरदपादुका । श्रीजालिंदराची मिरविते ॥

### Transliteration

Taree yaa Naatha-panthikaa | Mee-hee miravate mahee-lokaa | Taree mama maulee varada-paadu-kaa | Shree-Jaalindaraachee miravite ||

## Ovee 183

ऐसी ऐकोनि तियेची वाणी । बोलता झाला कानिफा मुनी । ऐसी असूनि बरवी करणी । जालिंदरातें मिरविली ॥

### Transliteration

Aisee aikoni tiyechee vaanee | Bolataa jhaalaa Kaaniphaa Muni | Aisee asuni baravee karanee | Jaalindaraate miravilee ||

## Ovee 184

तूं अनुग्रही असतां निश्चित । गुरु ठेवावा अश्वविष्ठेंत । मैनावती म्हणे श्रुत । आजि झालें महाराजा ॥

### Transliteration

Too anugrahee asataa nishchitu | Guru thevaavaa ashva-vishthentu | Mainaavatee mhane shrutu | Aaji jhaale Mahaaraajaa ||

## Ovee 185

मग आपुली कथा मुळापासुनी । तया नाथासी निवेदूनी । हें स्वसुताहातीं झाली करणी । मज न कळतां महाराजा ॥

### Transliteration

Maga aapulee kathaa mulaa-paasunee | Tayaa naathaasee niveduunee | Hey svasutaa-haatee jhaalee karanee | Maja na kalataa Mahaaraajaa ||

## Ovee 186

तरी आतां झाले कर्म । सज्ञाना सांवरीं दुर्गम । परी रायाचें दुष्टकर्म । टाळूनि सुपंथ मिरवीं कां ॥

### Transliteration

Taree aataa jhaale karmu | Sajnyaanaa saavaree durgamu | Paree raayaache dushta-karmu | Taaluni supantha miravee kaa ||

## Ovee 187

ऐसें सांगूनि तयाप्रती । मोहों उपजला अति चित्तीं । मग म्हणे श्रीगुरुमूर्ती । दृश्य करा लोकांत ॥

### Transliteration

Aise sanguni tayaa-pratee | Moho upajalaa ati chittee | Maga mhane Shree-guru-moortee | Drishya karaa lokaantu ||

## Ovee 188

म्हणशील सुताचे हातेंकरुन । कां न करिसी दृश्यमान । परी नेणों जालिंदराचा कोपाग्न । धांव घेईल पुढारां ॥

### Transliteration

Mhanasheela sutaache haaten-karunu | Kaa na karisee drishya-maanu | Paree neno Jaalindaraachaa kopa-agnu | Dhaav gheeela pudhaaraa ||

## Ovee 189

तरी बोधावा युक्तिप्रयुक्तीं । रक्षूनियां आपुल्या भाच्याप्रती । दृश्य करुनि गुरुमूर्ती । सत्कीर्ती भाच्या वरीं कां ॥

### Transliteration

Taree bodhaavaa yukti-prayuktee | Rakshuni-yaa aapulyaa bhaachyaa-pratee | Drishya karuni guru-moortee | Sat-keertee bhaachyaa varee kaa ||

## Ovee 190

मग या ब्रह्मांडमंडपांत । कीर्तिध्वज अति लखलखीत । हेळाऊनि परम लोकांत । कीर्तिध्वज फडकेल ॥

### Transliteration

Maga yaa Brahmaanda-mandapaantu | Keerti-dhvaja ati lakha-lakha-heetu | Helaauni parama lokaantu | Keerti-dhvaja phadakelu ||

## Ovee 191

ऐसें बोलूनियां तयाप्रती । मग उठती झाली मैनावती । त्यानेंही नमूनि परमप्रीतीं । बोळविलें भगिनीतें ॥

### Transliteration

Aise boluniyaa tayaa-pratee | Maga uthatee jhaalee Mainaavatee | Tyaanen-hee namuni parama-preetee | Bolavile bhagineete ||

## Ovee 192

पूर्ण आश्वासन देऊन । म्हणे रायाचें कल्याण इच्छी पूर्ण । श्रीगुरुचरण पाहूनि जाण । सकळ संशय सोडीं कां ॥

### Transliteration

Poorna aashvaasana deunu | Mhane raayaache kalyaana ichchee poornu | Shree-guru-charana pahuni jaanu | Sakala sanshaya sodee kaa ||

## Ovee 193

ऐशी आश्वासूनि माता । श्रीनाथ झाला बोळविता । असो मैनावती तत्त्वतां । नमूनि आली सदनासी ॥

### Transliteration

**Aishee aashvaasuni maataa | Shree-Naatha jhaalaa bolavitaa | Aso Mainaavatee tattvataa | Namuni aalee sadanaasee ||**

## Ovee 194

स्वसुतातें पाचारुन । सकळ सांगितलें वर्तमान । मग सकळ भयाचें दृढासन । भंगित झाले तत्क्षणीं ॥

### Transliteration

**Sva-sutaate paachaarunu | Sakala saangitale vartamaanu | Maga sakala bhayaache dridha-asanu | Bhangita jhaale tat-kshanee ||**

## Ovee 195

जालिंदराचे अनुग्रहासहित । आश्वासीत कानिफानाथ । ऐसा सकळ सांगूनि वृत्तांत । भयमुक्त तो केला ॥

### Transliteration

**Jaalindaraache anugraha-asahitu | Aashvaaseeta Kaanipha Naathu | Aisaa sakala saanguni vrittaantu | Bhaya-mukta toh kelaa ||**

## Ovee 196

असो आतां येथून । पुढिले अध्यायीं धुंडिनंदन । नरहरिवरदें श्रोत्यांकारण । मालू निवेदिल गुरुकृपें ॥

### Transliteration

**Aso aataa yethunu | Pudhile adhyaayee Dhundi-nandanu | Narahari-varade shrotyaan-kaaranu | Maaloo nivedila guru-kripe ||**

## Ovee 197

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोभाविक चतुर । षोडशाध्याय गोड हा ॥

### Transliteration

**Svasti shree-bhakti-kathaa-saaru | Sammata Goraksha-kaavya Kimayaa-gaaru | Sadaa parisobhaavika chaturu | Shodasha-adhyaaya goda haa ||**

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

***Shri Krishnarpanamastu***

***Shri Dattatreyarpanamastu***

इति श्रीनवनाथभक्तिसार षोडशाध्याय संपूर्ण ।

***Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Shodasha Sampurnah***